# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/12/2023 (बुधवार) दुपार


### घरफोडी

**१) पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत मौजा लोकमत कॉलनी न्यु एमआयडीसी कॉलनी बुट्टीबोरी येथे दिनांक ११/१२/२०२३ चे ०८.०० वा. रात्री ते दिनांक १२/१२/२०२३ चे ०८.०० वा. सकाळ पर्यंत यातील फिर्यादी नामे— उमेश लोबाराम येलसरे, वय ३२ वर्ष, रा. प्लॉट नं. आर एम १६० लोकमत कॉलनी न्यु एमआयडीसी कॉलनी बुट्टीबोरी हे घरी हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराचे कुलुप तोडुन घराचे आत प्रवेश करून लोखंडी कपाटातुन १) एक सोन्याचे मंगळसुत्र ८.२६ ग्रॅम वजनी किंमती १७०००/— रू, २) एक सोन्याची अंगठी ५ ग्रॅम वजनी किंमती १००००/—रू, ३) एक सोन्याची अंगठी २.५ ग्रॅम वजनी किंमती ५०००/—रू, ४) सोन्याचे एक जोडी कानातले डोरले ४.५ ग्रॅम वजनाचे किंमती ९०००/— रू, ५) एक सोन्याचा लॉकेट १ ग्रॅम वजनाचा किंमती २०००/—रू, ६) एक सोन्याचा पॅन्डल २.५ ग्रॅम वजनाचा किंमती ५०००/—रू, ७) चांदीची तोरडी एक जोडी किंमती ५००/— रू, ८) चांदीचा झुमका किंमती ५००/— रू. असा एकुण ४९०००/—रू. चा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. रेजिवाड पोस्टे बोरी मो. नं. ९८३४८२५७९३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर गायकवाड ले आऊट कळमेश्वर येथे दिनांक ११/१२/२०२३ चे ००.०० वा. ते दि. १२/१२/२०२३ चे ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शेख सत्तार शेख सरदार (सौदागर) वय ६० वर्ष, रा. गायकवाड ले आऊट कळमेश्वर हा त्याच्या परीवारासह नागपुर येथे कार्यक्रमाला गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे आत प्रवेश करुन बेडरुम मधील लाकडी आलमारी मधुन १) सोन्याचा गोप २० ग्रॅम किंमती २०,०००/—रु, २) सोन्याच्या हातातील बांगड्या २० ग्रॅम किंमती २०,०००/— रु, ३) सोन्याचा गोप ८ ग्रॅम किंमती ८०००/—रू ४) कानातील सोन्याच्या बिऱ्या २ जोड १३ ग्रॅम किंमती १६०००/— रु, ५) सोन्याचे कानातले २ जोड ६ ग्रॅम किंमती १०,०००/—रु, ६) सोन्याच्या अंगठ्या २ नग प्रत्येकी ४ ग्रॅम एकुण ८ ग्रॅम किंमती १००००/— रु, ७) एक रेडमी कंपनीचा मोबाईल ज्यात जिओ कंपनीचे सिम असलेला किंमती ३०००/—रू. असा एकुण ८७,०००/— रुपयाचा मुद्देमाल चोरी करुन नेला आहे.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गंगाधर ठाकरे, मो. नं. ९९२३९०८३८२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर